मौजे सिताबर्डी, ता.नागपुर (शहर), जि.नागपूर येथील स.क्र.३०३ नगर भूमापन क्र.१८४७ मधील एकुण आराजी ७४३४.०० चौ.मी. पैकी १६३.७१२ चौ.मी. शासकीय जमीन (पटवर्धन हायस्कूल यांच्या ताब्यातील) महसुल व वन विभागाकडे प्रत्यार्पण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः जिपशा-२०२४/प्र.क्र.११०/१०९३३९९/आस्था-१५
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०२५.

संदर्भ :

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.जमीन-२०१५/प्र.क्र.४५/ज-१, दि०१.०६.२०१७.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे जा.क्रमांक/जिपना/शिविप्रा/स्था-२/सिआरक्र/२९११/२०२५, दि.२६.०३.२०२५ चे पत्र.

## शासन परिपत्रक

महसूल व वन विभागाच्या संदर्भीय शासन निर्णयान्वये शासन मान्यता प्राप्त "निकडीचे सार्वजनिक प्रकल्प (Vital Public Projects)" या प्रकल्पांकरीता संबंधित प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील शासकीय जमिनींचा अगाऊ ताबा संबंधित प्रकल्प राबविणाऱ्या यंत्रणेस देणेबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

२. महसूल व वन विभागाच्या संदर्भ क्र.०१ येथील शासन निर्णयामध्ये नमुद कार्यपध्दतीनुसार ग्राम विकास विभागाच्या अधिपत्याखालील मौजे सितावर्डी, ता.नागपुर (शहर), जि.नागपूर येथील स.क्र.३०३ नगर भूमापन क्र.१८४७ मधील एकुण आराजी ७४३४.०० चौ.मी. पैकी १६३.७१२ चौ.मी. शासकीय जमीन (पटवर्धन हायस्कूल यांच्या ताब्यातील) नागपूर मेट्रो प्रकल्पास हस्तांतरीत करण्यासाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यास या शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. सदरहू जमीन नागपूर मेट्रो प्रकल्पाकरीता अंतिमत: वर्ग करण्याबाबतचे आदेश महसूल व वन विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९१११२३७३०१७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

KAUSTUBH SUDHAKAR RANE

Digitally signed by KAUSTUBH SUDHAKAR RANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=78b99ab06beb869e5c389d21dd25d4a1a60d87c91cb0bb868021d70abc925c3b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BAAAFEFABBD1DFDAD691286AA9D035C7536D65527975D97124960BB882959CDB, cn=KAUSTUBH SUDHAKAR RANE
Date: 2025.09.11 15:59:06 +05'30'

(कौस्तुभ राणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत-

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.मंत्री (ग्राम विकास व पंचपायत राज) यांचे खाजगी सचिव.
४) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
५) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
७) प्रधान सचिव (नवि-७), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
९) व्यवस्थापकिय संचालक, महा.मेट्रो रेल कार्पोरेशन लि., नागपूर.
१०) जिल्हाधिकारी, नागपूर.
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
१२) निवड नस्ती (आस्था-१५).